महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : आठवा दिनांक : 21/09/2024 वार : शनिवार

## विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित

### 27 सप्टेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक राज्याच्या दौऱ्यावर; धुरळा उडणार

**मुंबई (प्रतिनिधी) :** केंद्रीय निवडणूक आयोगाचे एक पथक येत्या 27 व 28 सप्टेंबर रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहे. हे पथक राज्यातील प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन स्थितीचा आढावा घेणार आहे. या बैठकीमुळे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जवळपास निश्चित झाल्याची चर्चा असून, त्याला या बैठकीनंतर हिरवा कंदील मिळेल असा दावा केला जात आहे.

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लवकर होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोग पुढील महिन्यात केव्हाही निवडणुकीच्या तारखांची घोषणा करण्याची शक्यता आहे. त्यानुसार सर्वच राजकीय पक्ष आपापल्या तयारीला लागलेत. त्यातच केंद्रीय निवडणूक आयोगाचे एक पथक येत्या 27 व 28 सप्टेंबर रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तारखांची वाट पाहणाऱ्या सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीने आपले कान टवकारलेत.



यासंबंधीच्या वृत्तानुसार, केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक 27 तारखेला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येऊन सलग दोन दिवस राज्यातील प्रमुख अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहे. या बैठकीत राज्यातील निवडणूक तयारीचा आढावा घेऊन हे पथक संबंधितांना योग्य ते दिशानिर्देश व सूचना करेल असा अंदाज आहे. या बैठकीनंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी ग्रीन सिग्नल मिळण्याची शक्यता आहे. विशेषत: राज्यातील सणवार व इतर महत्त्वाचे दिवस पाहून या बैठकीत निवडणुकीची तारीख ठरवली जाईल असे सांगितले जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे 288 सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेच्या यंदाच्या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे. गत काही वर्षांत राज्याचे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या 2 महत्त्वाच्या पक्षांत फूट अनुभवली आहे. सध्या या दोन्ही पक्षांचे 2 स्वतंत्र गट निवडणुकीच्या मैदानात आहेत. त्यातच माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात राज्यात तिसरी आघाडी स्थापन करण्याचेही प्रयत्न सुरू असल्यामुळे ही निवडणूक चांगलीच रंजकदार होणार आहे.

दुसरीकडे, महायुती व महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप जाहीर झाले नाही. या दोन्ही आघाड्यांत काही जागांवरून अद्याप मतभेद आहेत. त्यामुळे त्यांच्या जागावाटपाला अजून काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. पण वंचित बहुजन आघाडीने शनिवारी आपल्या 11 उमेदवारांची यादी जाहीर करून सर्वांना आश्चर्यचकीत केले आहे. वंचितने आपल्या मित्र पक्षांच्या इतर 2 उमेदवारांच्याही नावांची घोषणा केली आहे. त्यामुळे उमेदवार जाहीर करण्यात या महत्त्वाच्या पक्षाने सर्वच इतर पक्षांवर आघाडी घेतली आहे.




**मुंबई :** मुंबई विद्यापीठाची 22 सप्टेंबर रोजी होणारी सिनेट निवडणूक महाराष्ट्र शासनाकडून रद्द करण्यात आली होती. याच्या विरोधात युवा सेनेने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी पार पडली असून राज्य सरकारला न्यायालयाने दणका दिला आहे. आता मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणूक उद्याच घेण्यात यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीबाबत याचिकाकर्ते आणि विद्यापीठ यांच्यात युक्तिवाद झाला. न्यायमूर्ती अतुल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या सुट्टीकालीन खंडपीठापुढे तातडीची सुनावणी पार पडली व त्यानंतर निवडणूक उद्याच घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. यामुळे आदित्य ठाकरे यांच्या युवासेनेला दिलासा मिळाला आहे.

युवा सेना मुंबई सिनेट निवडणुकीचे उमेदवार आणि याचिकाकर्ते प्रदीप सावंत म्हणाले, हा लोकशाहीचा विजय आहे. आम्ही पूर्णपणे निवडणुकीला उद्या सामोरे जाण्यासाठी तयार आहोत. अवघे काही तास शिल्लक राहिलेले असताना सुद्धा आमची शिवसेनेची फौज तयार आहे. गेल्या वेळेस सारखे आम्ही दहाच्या दहा जागांवर विजय मिळवणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. रडीचा डाव विद्यापीठ आणि राज्य सरकारने खेळला पण त्याचा काही उपयोग झाला नाही, कोर्टाने निर्देश दिले आहेत, अशी टीका त्यांनी राज्य सरकारवर केली आहे.

दरम्यान, मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणूक रद्द करण्यात आल्यावर युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला होता. एवढे घाबरट व गद्दार मुख्यमंत्री महाराष्ट्राने याआधी कधीही पहिले नाहीत, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत केली होती.

या आदेशानंतर ठाकरे गटाचे नेते वरुण सरदेसाई म्हणाले, मुंबई उच्च न्यायालयाचे आम्ही आभारी मानू इच्छितो. कारण वेळीच त्यांनी सुनावणी घेऊन उद्याच्या उद्या निवडणूक घेण्याविषयी निर्देश दिले. हा विजय केवळ युवा सेनेचा नसून 13 हजार 500 पदवीधरांचा विजय आहे. या सरकारने जे पदवीधरांच्या बाबतीत षड्यंत्र रचले होते ते न्यायालयाने हाणून पाडले आहे.

## राहुल गांधींना धमक्या देणारे सत्ताधारी अजून मोकाट

### नेत्यांनी घेतली राज्यपालांची भेट, कडक कारवाई करण्याचे मिळाले आश्वासन



**मुंबई (प्रतिनिधी) :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या जिवाला धोका आहे. त्यांच्याविरोधात हिंसक व अश्लाघ्य विधाने करणारे सत्ताधारी अजून मोकाट असून, त्यांच्यावर कडक कारवाई करा, अशी मागणी काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने शनिवारी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्याकडे केली. राज्यपालांनीही त्यांचे निवेदन गांभीर्याने घेत त्यांना या प्रकरणी गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याची ग्वाही दिली.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून राज्यात राजकीय व सामाजिक अस्थैर्य निर्माण झाले आहे. विदर्भ आणि मराठवाडा येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. परंतु मदत मिळाली नाही. यामुळे जनतेमध्ये, शेतकरी वर्गात प्रचंड प्रमाणात अस्वस्थता आहे. ही सर्व परिस्थिती राज्याचे प्रमुख म्हणून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या निदर्शनास आणण्यासाठी आज काँग्रेसच्या शिष्टमंडळाने राजभवन येथे राज्यपालांची भेट घेतली. यावेळी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाकडून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार चंद्रकांत हंडोरे, विशाल पाटील, आमदार अस्लम शेख, अमीन पटेल, नितीन राऊत, विश्वजित कदम, आरिफ नसीम खान, विक्रम सावंत, सचिन सावंत उपस्थित होते.

महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. हा पुतळा कोसळणे म्हणजे महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळणे आहे. तरी अजून या सबंधित लोकांवर कारवाई झालेली नाही. महाराष्ट्र हा सहिष्णू राजकारण साठी ओळखला जातो. असे असताना आमचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात हिंसक विधान करण्यात आली आणि ती देखील सत्ताधारी आमदार आणि खासदारांनी विधाने केली. आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास बक्षीस देण्याची तर खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके देण्याची अश्लाघ्य विधाने केली. या विधानानी त्यांच्या जीवाला धोका असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

लोकशाहीत विरोधकांवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण विरोध करताना जीवाला धोका निर्माण करणे, हिंसेला प्रवृत्त करण्याची भाषा लोकप्रतिनिधींनी वापरणे हे कायद्याला धरून नाही. या प्रकरणात मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी आणि पोलिसांनी खेदाने बघ्याची भूमिका घेतली. गुन्हा दाखल करण्यासाठी देखील काँग्रेस नेत्यांना आंदोलन करावी लागली त्यानंतर गुन्हे दाखल झाले, पण आमदार संजय गायकवाड आणि खासदार अनिल बोंडे यांना अजूनही अटक करण्यात आलेली नाही. या दोन्ही लोकप्रतिनिधींना तात्काळ अटक झाली पाहिजे, ही आमची मागणी शिष्टमंडळाने केली आहे.

महाराष्ट्रात प्रक्षोभक विधान करून देखील आमदारावर पोलिस कारवाई करत नाही याचा अर्थ राज्यात दंगली घडवण्याचा सत्ताधारी पक्षांचा कट आहे का, अशी शंका उपस्थित होत आहे.

मराठवाड्यात अतिवृष्टी झाली, शेतकऱ्याचे सहा लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. अजूनही याचे पंचनामे झालेले नाहीत. केंद्रीय कृषी मंत्री यांनी आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्याचा दौरे करून मदत जाहीर केली पण महाराष्ट्रात मात्र अजूनही केंद्रीय कृषी मंत्री किंवा केंद्रीय पथक पाहणी करण्यास आले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबाबत इतका दूजाभाव का? या राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा दिसत नाही का त्यांना मदत करण्याची केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका नाही.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे. विधानसभा निवडणूक निर्भय वातावरणात होईल याबाबत शंका आहे. राज्यात महिलांवरील अत्याचारात मोठ्याप्रमाणावर वाढ झाली असून अल्पवयीन, शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या बदलापूर व नागपूर येथे घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना पाठीशी घालण्याचे काम सरकारकडून केले जात आहे. स्पर्धा परीक्षा रखडल्या आहेत. उमेदवारांना सरकारकडून नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. युवा पिढी बेरोजगारीमुळे नैराश्याच्या गर्तेत जात आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण सरकारला निर्देश द्यावेत, अशी राज्यातील जनतेची आपणाकडून अपेक्षा आहे, असे काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालणार असल्याचे आश्वासन काँग्रेस शिष्टमंडळाला दिले आहे. त्याचबरोबर वादग्रस्त विधानबाबत गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे आश्वासनही राज्यपाल यांनी दिले.




**औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) :** मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणासाठी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मुस्लिम समाज बांधवांकडून छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौक ते आंतरवाली सराटी अशी पदयात्रा काढली जाणार आहे. ही पदयात्रा रविवारी, २२ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता क्रांती चौक येथून निघणार आहे, अशी माहिती आयोजक कलीम सलीम पटेल यांनी दिली आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात यावे. सगे-सोयऱ्यांचा कायदा पारित करण्यात यावा, या मागणीसाठी गेल्या अनेक दिवसांपासून मराठा आरक्षणाचे नेते मनोज जारंगे पाटील लढा देत आहे.

याच मागणीसाठी पुन्हा एकदा मनोज जरंगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. या उपोषणामुळे जरंगे पाटील यांची वारंवार तब्येत खराब होत आहे. याकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या उपोषणाला मुस्लिम बांधवांकडून पाठिंबा दिला आहे. या उपोषणाच्या समर्थनार्थ क्रांती चौक ते अंतरवाली सराटी अशी पदयात्रा काढली जाणार आहे. या पदयात्रेत ५० मुस्लिम बांधव सहभागी होणार आहे. हे पायात चप्पल बूट न घालता पदयात्रेत चालणार आहे.. रविवारी सकाळी दहा वाजता क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अंतराली सराटीकडे ही यात्रा रवाना होईल. या पदयात्रेबाबत आयोजक कलीम सलीम पटेल यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक यांना पत्र दिले आहे.

प्रवेश सुरू ! प्रवेश सुरू !! प्रवेश सुरू !!!

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

Sanitary Health Inspector

या कोर्ससाठी प्रवेश चालू आहेत

संपर्क : 9405109103, 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002